निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : १९४ वा.
बुधवार - १७ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247




# महाराष्ट्रात पावसाचे थैमान!

## ऑगस्ट-सप्टेंबरच्या अतिवृष्टीमुळे ३० जिल्ह्यांत लाखो हेक्टर पाण्यात, किती क्षेत्र बाधित? कृषिमंत्री दत्ता भरणेंची माहिती

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महाराष्ट्रात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तब्बल ३० जिल्ह्यांमध्ये शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात आले आहेत. गेल्या दोन महिन्यांमध्ये राज्यात पावसाचे थैमान चालू असून, पुर आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्यातील १,७८५,७१४ हेक्टर (४,२८४,८४६ एकर) क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे. या काळात प्रामुख्याने खरीप पिकांचे नुकसान झाले असून, सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यासोबतच भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद यांनाही मोठा फटका बसला आहे.

कृषिमंत्री काय म्हणाले?

ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीनंतर काही जिल्ह्यातले पंचनामे पूर्ण होऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. उर्वरित क्षेत्रांच्या पंचनाम्याचे काम युद्ध पातळीवर सुरू असून लवकरच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी शासन स्तरावर उपाययोजना सुरु आहेत. अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. तसेच शेतकऱ्यांनी खचून न जाता धैर्याने या परिस्थितीचा सामना करावा, राज्य सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्यात पावसाचे थैमान चालू असून गेल्या दोन महिन्यात अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील तब्बल ३० जिल्ह्यांतील १९५ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४ महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

सर्वाधिक नुकसान कुठे?

सर्वाधिक नुकसान झालेले जिल्हे नांदेड (७२८,०४९ हेक्टर), यवतमाळ (३१८,८६० हेक्टर), वाशीम (२०३,०९८ हेक्टर), धाराशिव (१५७,६१० हेक्टर), अकोला (१७७,४६६ हेक्टर), सोलापूर (४७,२६६ हेक्टर) आणि बुलढाणा (८९,७८२ हेक्टर) आहेत. राज्यातील एकूण १९५ तालुक्यांमध्ये या अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून ६५४ महसूल मंडळांतील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.बाधित पिके: सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे.




काही ठिकाणी भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद या पिकांनाही फटका बसला आहे.

कृषीमंत्री भरणे यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले की, राज्य सरकार त्यांच्या पाठीशी उभी आहे आणि त्यांना आर्थिक तसेच तांत्रिक मदत मिळेल. या परिस्थितीत शेतकऱ्यांनी धैर्य गमावू नये, योग्य मार्गदर्शन घेऊन आपली शेती सुधारण्यावर भर द्यावा, अशी अपेक्षा सरकारने व्यक्त केली आहे.

ऑगस्ट-सप्टेंबरच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या या मोठ्या नुकसानामुळे शेतकरी आणि राज्यासाठी मोठा आव्हान उभा राहिला आहे. मात्र, योग्य वेळेत नुकसानभरपाई, मदत आणि तांत्रिक मार्गदर्शन मिळाल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक संकट कमी होण्याची शक्यता आहे.

## मायबाप त्रिमूर्ती सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ ५० हजार रुपये हेक्टरी नुकसान भरपाई देण्याचे आदेश काढा- वसंत मुंडे

**आत्ताच एक्सप्रेस**



**खुलताबाद/ प्रतिनिधी/**महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे उभ्या पिकाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असूनसुद्धा शासनाने केंद्र व राज्याच्या एनडीआरएफ व एसडीआरएफ च्या नियमाच्या अंतर्गत अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकाचे नुकसान जनावरे मरण पावली शेतकऱ्यांचे घरे व गोठ्याचे नुकसान झाले अनेक शेतकरी मृत्युमुखी पडले असून त्रिमूर्ती सरकारने वेगवेगळे निकषांतर्गत पंचनामे करून हेक्टरी ५०हजार रुपये तात्काळ आर्थिक मदत करण्यासंदर्भात आदेश काढून शेतकऱ्यांच्या बँकेच्या खात्यात वर्ग करण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली. अतिवृष्टी व ढगफुटीमुळे शेतकऱ्यांच्या शेतात धरणाचे नदी नाल्याचे पुराचे पाणी घुसल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर सर्व स्तरात शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. पिके जनावरे शेतातील गोठे वेगवेगळे फळबाग इलेक्ट्रिक मोटर शेती अवजारे वाहून गेलेले आहेत. सर्व स्तरात शेतकरी आर्थिक दृष्ट्या हातबल झालेला असून शेतकऱ्यांनी अनेक तक्रारी करूनही शेतकऱ्याला पिक विमा अतिवृष्टीचे व वेगवेगळे शासकीय अनुदानाचे पैसे आजतागायत मिळालेले नाहीत. अगोदरच शेतकऱ्याला दुबार पेरणी करावी लागली आहे निसर्गाची साथ नसल्यामुळे बोगस खते बी बियाणे कीटकनाशके औषधी मुळे शेतकरी चारी बाजूंनी आर्थिक दृष्ट्या अडचणीत आलेला आहे तरी शासन शेतकऱ्याला हमीभावाप्रमाणे बाजारपेठेत शेतीमाल शेतकऱ्याचा खरेदी विक्री होत नाही त्यावर शासन कडक धोरण अवलंबित नाही . त्यामुळे शेतकरी हा संपूर्णपणे कौटुंबिक अडचणीमुळे मुलांच्या शिक्षण दैनंदिन व्यवहार आणि जीएसटी कर हा विविध ठिकाणी शेतीच्या अवजारे व मालावर बी बियाणे कीटकनाशके औषधावर लावल्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेला आहे. तरी विनाअट एनडीआरएफ एचडीआरएफ च्या निकषांतर्गत हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत तात्काळ शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्याचे आदेश देण्यात यावेत अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली.



## कब्रस्तानकडे जाण्यासाठी वाट नाही; ताजनापुर येथे मृतदेह पाण्यातून नेण्याची वेळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/ प्रतिनिधी/**खुलताबाद तालुक्यातील ताजनापुर येथे दफनविधीसाठी जाणाऱ्या नातेवाईकांना मंगळवारी (ता.१६) पाण्यातून मार्ग काढत मृतदेह घेऊन जावे लागले. दौलतबी सांडू पटेल (वय ८५) यांच्या दफनविधीवेळी हा प्रकार घडला असून, या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.या परिस्थितीने उपस्थित सर्वांना 'जीवन जगताना आले अनेक अडसर, मेल्यानंतर वाटले नव्हते मार्ग होईल खडतर या ओळींची आठवण करून दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, ताजनापुर येथील कदीर पटेल व छोटू पटेल यांच्या आई दौलतबी यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांचा दफनविधी स्थानिक मुस्लिम कब्रस्तानात करण्यासाठी नातेवाईक रवाना झाले. मात्र कब्रस्तान धांड नदीच्या पलीकडे असल्याने आणि गेल्या दोन दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे नदीपात्र पाण्याखाली गेल्याने नागरिकांना थेट पाण्यातूनच मार्ग काढावा लागला.

या ठिकाणी बांधण्यात आलेल्या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यावरूनदेखील जाण्यासाठी कोणताही मार्ग उपलब्ध नसल्याने मृतदेह नदीच्या पात्रातून नेण्याची वेळ आली. या दुर्लक्षामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष इद्रीस पटेल यांनी सांगितले की, बाजारसावंगी गावातून वाहणारी धांड नदी गिरजा मध्यम प्रकल्पात जोडण्याची मागणी विद्यमान आमदार प्रशांत बंब यांच्याकडे वारंवार केली आहे. मात्र ती अद्याप पूर्ण झालेली नसल्याने आज अशी दुर्दैवी परिस्थिती निर्माण झाली.

नागरिकांचे म्हणणे आहे की, बंधाऱ्याची देखभाल व दुरुस्तीबाबत जिल्हा प्रशासन व संबंधित विभागाने वेळेत लक्ष दिले नाही. त्यामुळे कब्रस्तानकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याचा प्रश्न गंभीर बनला असून, तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी होत आहे.

**तालुक्यातील ताजनापूर गावांत कब्रस्ताना जाण्यासाठी रस्ते नसल्यामुळे पावसाळ्याच्या दिवसांत मृत व्यक्तीची दफनविधी नदी, ओढा यांचा प्रवाह पार करून कब्रस्तान पर्यंत नेण्यात येते.मात्र, प्रशासनानं अद्यापही आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केलं आहे' जिथे मुस्लिम समाजाची कब्रस्तान आहे मृतदेह दफनविधीसाठी सोय आहे,त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी रस्ताच नाही.परिणामी,मृतदेह खांद्यावरून नेण्याची वेळ नातेवाईकांवर येते. पावसाळ्यात ही परिस्थिती अधिकच बिकट होते. चिखलातून, नाल्यांमधून मृतदेह नेणं,ही कुटुंबियांसाठी मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या अत्यंत त्रासदायक बाब ठरते.**

# मराठवाडा मुक्तीसंग्राम : लोकशक्ती, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचा अमर प्रवास

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास मांडताना आपण केवळ परकीय सत्तेविरुद्ध झालेल्या राजकीय संघर्षाचा विचार करतो. पण हा इतिहास तेवढ्यापुरता मर्यादित नाही; तो समाजातील विविध स्तरांतील असमानता, शोषण, जातिभेद, धार्मिक दडपशाही आणि आर्थिक अन्यायाविरुद्ध झालेल्या संघर्षाचाही आहे. भारतात १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्याचा सूर्य उगवला, पण या स्वातंत्र्याच्या किरणांचा लाभ सर्व भारतीयांना एकसमानपणे झाला नाही. ब्रिटिश साम्राज्याचे जोखड झुगारून देश स्वतंत्र झाला, तरी हैदराबाद संस्थान निजामाच्या ताब्यात होते. त्याच्या हुकूमशाही वृत्तीमुळे आणि रझाकारांच्या दहशतीमुळे मराठवाडा अजूनही गुलामगिरीतच होता. निजामशाहीच्या राजवटीतील अन्याय, रझाकारांची दहशत आणि सामाजिक–आर्थिक शोषण यांचा भोग मराठवाड्यातील सामान्य माणसाला करावा लागत होता. त्यामुळे मराठवाडा मुक्तीसंग्राम हा केवळ राजकीय स्वातंत्र्याचा नव्हे तर सामाजिक न्याय व लोकशक्तीचा लढा ठरला. म्हणूनच मराठवाड्याला खरी मुक्ती १७ सप्टेंबर १९४८ रोजी मिळाली. हा मुक्तीसंग्राम केवळ राजकीय विलिनीकरणाचा प्रश्न नव्हता, तर सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि लोकशाही मूल्यांसाठी झालेला व्यापक संघर्ष होता. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर हा संघर्ष हा जनतेच्या आत्मजागृतीचा, लोकशक्तीच्या एकात्मतेचा आणि परिवर्तनाच्या ध्यासाचा इतिहास आहे.मराठवाडा मुक्तीसंग्राम या संघर्षाचे समाजशास्त्रीय विश्लेषण करताना आपण हे पाहतो की हा लढा वर्गसंघर्ष, जातीभेद, धार्मिक भेद आणि लिंगदडपशाही यांच्या विरोधातील एक व्यापक सामाजिक चळवळ होती. या चळवळीच्या तात्विक प्रेरणेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान ठळकपणे दिसते. त्यांनी समाजाला दिलेले 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हे तत्त्वज्ञान मराठवाड्याच्या शेतकरी, मजूर, स्त्रिया आणि दलित घटकांसाठी दीपस्तंभ ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे वंचित समाजात आत्मसन्मानाची भावना जागृत झाली आणि त्यांनी मुक्तीसंग्रामात सक्रिय सहभाग घेतला.निजामशाहीत मराठवाड्याचे समाजजीवन असमानता, दडपशाही आणि शोषणाने पिडलेले होते. शेतकऱ्यांना जमीनदारशाहीच्या जोखडाखाली अवाजवी कर द्यावे लागत असत. वेठबीगारी करणे भाग होते. पिकावरच्या मालकीपेक्षा कराचा बोजा अधिक होता. शेतकरी हा उत्पादन करणारा असला तरी त्याला फक्त उपासमारी उरायची. दलित समाज अस्पृश्यतेच्या बेड्यात अडकला होता. त्यांना सामाजिक सन्मान वा अधिकार नव्हता. स्त्रियांना शिक्षण मिळत नव्हते; उलट अनेकदा त्यांना जबरदस्ती, अत्याचार आणि दडपशाही सहन करावी लागत होती. उर्दू भाषेचे वर्चस्व लादून मराठी भाषा व संस्कृतीला दुय्यम दर्जा देण्यात आला. धार्मिक भेदभाव वाढवून बहुसंख्य लोकांना दुय्यम दर्जा मिळत होता. ही सगळी परिस्थिती समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'संरचनात्मक अन्याय' म्हणून पाहता येते, जिथे संपूर्ण समाजव्यवस्था ही सत्त–ाधारी वर्गाच्या हितासाठी कार्यरत असते. याच पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायाची संकल्पना पुढे ठेवली. त्यांनी सांगितले की स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेतून मुक्ती नव्हे, तर प्रत्येकाला समान संधी, सन्मान आणि हक्क मिळणे होय.या सामाजिक शोषणाच्या रचनेला रझाकारांच्या दहशतीने अधिक भयानक रूप दिले. कासिम रिजवीच्या नेतृत्वाखाली रझाकार संघटना उभी राहिली. त्यांनी खेड्यापाड्यात हिंसाचार माजवला होता. घरांची लूट, शेतसंपत्तीचा नाश, स्त्रियांवर बलात्कार, जबरदस्ती धर्मांतर, खून आणि दरोडे हे त्यांचे दैनंदिन व्यवहार बनले. शेतकऱ्यांची जनावरे हिसकावली जात, पिके जप्त केली जात होती. गावोगावी रझाकारांची भीती पसरली होती. ही स्थिती समाजशास्त्रीय दृष्टीने सत्ताव्यवस्थेच्या 'दहशतवादी साधनांद्वारे नियंत्रण' या संकल्पनेचे उदाहरण ठरते. या दडपशाहीविरुद्ध मराठवाड्याने आवाज उठवला होता. हैदराबाद राज्य काँग्रेसने चळवळीची सूत्रे हातात घेतली. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची चळवळ उभी राहिली. गोविंदभाई श्रॉफ, शंकरराव चव्हाण, बाबासाहेब परांजपे, आ. कृ. वाघमारे, दिगंबरराव बिंदू यांसारख्या नेत्यांनी जनतेला संघटित केले. भूमिगत संघटना तयार करून रझाकारांविरुद्ध सशस्त्र संघर्ष छेडला गेला. परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद (धाराशिव), औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) या जिल्ह्यांत हजारो कार्यकर्त्यांनी सत्याग्रह, निदर्शने आणि प्रतिकार यांत भाग घेतला. शेतकऱ्यांनी जमिनीच्या हक्कासाठी, विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि भाषेच्या मान्यतेसाठी, तर स्त्रियांनी समाजातील सन्मानासाठी या लढ्यात सहभाग घेतला. हा संघर्ष म्हणजे लोकशक्तीचा अभूतपूर्व जागर होता, जो समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून 'जनआंदोलनाच्या सामूहिक कृतीचा अभ्यास' दाखवतो. या जनआंदोलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अप्रत्यक्षपणे सर्वत्र कार्यरत होते. त्यांनी दिलेली आत्मसन्मानाची शिकवण दलित समाजाला संघर्षासाठी उभारी देणारी ठरली. मानवाला मानव म्हणून समान हक्क मिळाले पाहिजेत ही त्यांची भूमिका मराठवाड्यातील जनतेच्या रक्तात मिसळली होती. सामाजिक न्यायासाठीचा हा लढा लोकशक्तीच्या ऐक्याने पुढे सरकत राहिला. हिंदू–मुस्लिम ऐक्य, दलित–बहुजन एकजूट, स्त्रियांचा सहभाग या सर्वांनी मुक्तीसंग्रामाला सामाजिक क्रांतीचे रूप दिले.भारतीय सैन्याने अवघ्या पाच दिवसांत निजामशाही संपवली आणि १७ सप्टेंबर रोजी हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. या घटनेने मराठवाड्याच्या जनतेला खरे स्वातंत्र्य दिले गेले. हे स्वातंत्र्य केवळ राजकीय नव्ह–ते, तर ते सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाही यांचे नवे दार उघडणारे ठरले.मराठवाडा मुक्तीनंतर मराठवाड्याचे समाजजीवन झपाट्याने बदलले. मराठी भाषेला शैक्षणिक व प्रशासकीय मान्यता मिळाली. शाळा व महाविद्यालये उभारली गेली. म्हणूनच मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन हा केवळ ऐतिहासिक विजयाचा उत्सव नसून, सामाजिक परिवर्तनाचा दीपस्तंभ आहे.

# माजलगाव मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणारे व्यक्तीमत्व लोकनेते स्व.सुंदररावजी सोळंके साहेब

**आत्ताच एक्सप्रेस**

**माजलगाव /प्रतिनिधी /शेख हमीद**/ विकासापासुन वंचित असलेल्या माजलगाव विधानसभा मतदार संघाला विकास प्रवाहात आणण्यासाठी आप–ली राजकीय शक्ती वापरून साखर कारखान्यासह इतर विविध विकास योजना प्रत्यक्षात कार्यन्वीत करून, सर्वांगीण विकासाला चालना देण–ारे व्यक्तीमत्व म्हणुन ओळखले जाणारे लोकनेते सुंदररावजी सोळंके साहेब यांची आज जयंती आहे.त्यानिमित्त दोन शब्द मोहखेड सारख्या डोंगराच्या पायथ्याथी असलेल्या गावातुन आलेले व कुठलाही राजकीय वारसा नसताना सुंदररावजी सोळंके साहेब नावाचे नेतृत्व राजकारणात राज्याच्या उपमुख्यमंत्री पदापर्यंत राजकीय प्रवास करत माजलगाव मतदार संघासह राज्यातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी नि:स्वार्थीपणे शेवटच्या घटके पर्यंत प्रयत्न करणारे नेतृत्व होते.ते पेशाने वकील होते. परंतु त्यांना प्रारंभी पासुनच समाजकारणाची आवड असल्याने थोडे दिवस केज न्यायालयात वकीली केल्यानंतर त्यांनी सामाजिक कार्य करत ते राजकारणात सक्रिय झाले. सुरूवातीस पुर्वीच्या लोकल बोर्ड (सध्याचे जि.प.सदस्य)सदस्य ते अध्यक्ष नंतर आमदार, राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री ते महाराष्ट्राचे पहिले उपमुख्यमंत्री असा राजकीय प्रवास केला.आपल्या या पदांचा त्यांनी जनतेच्या, शेतकऱ्यांच्या जिव्हळ्याचे प्रश्न सोडविण्यासाठी उपयोग केला.पुर्वी माजलगाव मतदार संघात पाण्याचे क्षेत्र नसल्याने वाळवंटागत परिस्थिती असल्यानेशेतकरी केवळ पावसाच्यापाण्यावर अवलंबून शेती करत होते.त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती खुपच बेताची होती.सुंदररावजी सोळंके साहेब यांनी मतदार संघात जलसिं–चनाचे क्षेत्र वाढावे याकरिता माजलगाव धरण, कुंडलिका धरण या दोन मोठ्या प्रकल्पासह इतर अनेक लहानमोठे धरणे उभारले.यामुळे मतदार संघात पाण्याचे स्रोत वाढत जाऊ लागल्याने शेतकरी वर्षात दोनदा पीके घेऊ लागले.तसेच पाण्याचे क्षेत्र झाल्याने शेतकरी ऊसाकडे वळला गेला.ऊसाचे उत्पन्न वाढु ला–गले. त्यामुळे लोकनेते सुंदररावजी सोळंके यांनी मतदार संघात साखर कारखाना उभारला.या कारखान्याच्या माध्यमातुन तर शेतकऱ्यांच्या जीवनात सुबत्ताच आली म्हटले तर वावगे ठरणार नाही. साखर कारखान्याच्या माध्यमातुन शेतकरी तर सुधारलाच शिवाय मतदार संघातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना कारखान्यात नोकरी मिळाल्या थोडीफार बेरोजगारी कमी होण्यास मदत झाली.तसेच इतरही अनेकांना रोजगाराच्या संधी मिळाल्याने हा कारखाना म्हणजे सर्वांसाठी आर्थिक प्रगती करणारा ठरला.पुढे शेतकऱ्यांना जोडधंदा व्हावा



म्हणुन दुग्ध व्यवसाय ही मतदार संघात चालु केला.या शिवाय माजलगाव मतदार संघात विद्यार्थ्यांना येथेच शिक्षण घेता यावे म्हणून साहेबांनी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून अनेक ठिकाणी शाळा, कॉलेज उभारले.यामुळे विद्यार्थ्यांना सहज शिक्षण उपलब्ध झाले. तसेच मतदार संघात औद्योगिक वसाहत करण्यासाठी प्रस्ताव पाठवला होतो.तो त्यांचे पुत्र आ.प्रकाश दादा सोळंके यांनी पूर्णत्वास नेला.एकुनच सुंदररावजी सोळंके साहेब यांनी मतदार संघाच्या सर्वांगीण विकसाचा घेतलेला विडा नि:स्वार्थीपणे पार पाडत मतदार संघात अनेक विकास योजना प्रत्यक्षात राबवत विकासाची गंगा आणण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांच्या पश्चात त्यांचे सुपुत्र आ.प्रकाश दादा सोळंके, पुत्र धैर्यशील काका सोळंके वारसा चालवत आहेत. लोकनेते स्व.सुंदररावजी सोळंके साहेब यांच्या आशिर्वादाने व प्रेरणेने आ.प्रकाश दादा हे तब्बल चारवेळा आमदार म्हणुन निवडुन येऊन मतदार संघातील जनतेचे मुलभूत प्रश्न सोडवण्यासाठी कायम प्रयत्नशील असतात.

त्यांना धैर्यशील काका सोळंके यांची खंबीर साथ देत आहे.तसेच स्व.साहेब व दादा,काका यांचा सोळंके घरण्याचा वारसा कारखान्याचे चेअरमन विरेंद्र दादा सोळंके व व्हा.चेअरमन जयसिंह भैया सोळंके हे दोन बंधु साहेब व दादा, काकांच्या पावलावर पाऊल टाकत पुढे सक्षम व समर्थपणे चालवत आहेत. ते लोकांमध्ये मिसळून, त्यांच्या अडीअडचणी,प्रश्न, समस्या जाणुन घेत त्या सोडवण्यास कायम प्रयत्नशील असतात.ज्या प्रमाणे साहेब, दादा, काका लोकांशी आदबीने वागत, अगदीच तसेच यासर्वांच्या आशिर्वादाने विरेंद्र दादा व जयसिंह भैया लोकांशी वागत आहेत.ही स्व.साहेबांची तिसरी पिढी राजकारण, समाजकारणात सक्रिय आहे.लोकनेते स्व.सुंदररावजी सोळंके साहेब यांनी कुठलीही आपेक्षा न ठेवता नि:स्वार्थीपणे आपल्या जीवनाच्या शेवटच्या घटके पर्यंत प्रयत्न करत जन–सेवेचे कार्य कायम ठेवले होते.अशा या नि:स्वार्थी लोकनेत्यास जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...

# श्री गणेश गिरी गटशिक्षणाधिकारी म्हणून परळी येथे रुजू ..सत्कार संपन्न



**आत्ताच एक्सप्रेस**

**परळी / प्रतिनिधी**/ गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती परळी या पदावर श्री गणेश गिरी साहेब हे रुजू झाल्याने व त्यांना परळी तालुक्यातील या पूर्वी प्रदीर्घ अनुभव असल्याने व शिक्षक वर्गातही त्यांच्या विषयी चांगला अनुभव असल्याने आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

या बद्दल त्यांचा गटशिक्षणाधिकारी कार्यालय परळी येथे सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षक नेते शाम आघाव सर, शिक्षण विस्तार अधिकारी गोविंद कराड साहेब,संगणक विभाग प्रमुख बाळासाहेब बोंदर साहेब ,आदर्श शिक्षक अशोक नावंदे,दगडवाडी शाळेचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम केंद्रे सर,हरिश्चंद्र चाटे सर,संतोष सावजी,प्रदीप चाटे सर,प्रकाश चाटे सर,परमेश्वर दहिफळे सर,रत्नाकर फड सर,केंद्रप्रमुख नवनाथ राख सर,चांगिरे सर,पडगी सर,जातकर सर,रेवलकर सर उपस्थित होते.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

आज १७ सप्टेंबर, आजचा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र मराठवाडा प्रांत हा पारतंत्र्यातच होता. पूर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थांनात विलीन होता. हैदराबाद संस्थानावर निजाम उर उस्मान अली खान निजाम उल मुल्क आसफजाह याचे राज्य होते.

निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास स्पष्ट नकार दिला होता. मात्र हैदराबाद संस्थानातील जनता भारतात सामील होण्याच्या बाजूने होते. निजामाच्या संस्थानातून मुक्त होऊन भारतीय संघ राज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम आंदोलन सुरू झाले. हैदराबाद संस्थानाची लोकसंख्या त्यावेळी दीड कोटीच्या वर होती. या संस्थांनात तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग होता. मुक्ती संग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेना–पती कासीम रिझवी याने जनतेवर खूप अत्याचार केले.

दुसऱ्या बाजूला स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संग्राम वेगात सुरू होता. मराठवाडा मुक्ती संग्राम मराठवाड्यातील गावागावात लढला जात होता. यात हजारो स्वातंत्र्य सैनिक पुढे आले. स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ लढ्यानंतरही निजाम शरण येत नाही उलट जनतेवरील अन्याय अत्याचार वाढतच आहे हे पाहून १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद संस्थानात पोलीस कारवाई सुरू केली. सरदार वल्लभभाई पटेल हे त्यावेळी भारताचे गृहमंत्री होते. ते खूप धाडसी होते त्यांच्या धाडसी आणि अचूक निर्णयाने जनतेस न्याय मिळाला. मुख्य फौजा सोलापूरकडून घुसल्या. पहाटे चार वाजता कारवाई सुरू झाल्यावर २ तासात नळदुर्ग व सांयकाळ पर्यंत तुळजापूर, परभणी ते मणीगड, कनेरगाव भारतीय फौजांनी सर केले. चाळीसगावहुन निघालेल्या फौजेने कन्नड,दौलताबाद काबीज केले. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद सर करून भारतीय फौजा पुढे निघाल्या.

भारतीय फौजांपुढे निजामाच्या फौजेचे काही चालले नाही. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाचा सेनाप्रमुख जनरल अल इद्रीस याने शरणा–गती पत्करली. सेनाप्रमुखच शरण गेल्याने निजामही शरण आला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या गुलामीतून मुक्त झाले. हैदराबाद मुक्ती संग्राम यशस्वी झाला. हैदराबाद संस्थानावर तिरंगा फडकला. हैदराबाद संस्थानातील निजामाच्या अन्यायी राजवटी विरुद्धचा लढा मराठवाड्यातील जनतेने यशस्वी केला . तेंव्हापासून आजचा दिवस म्हणजे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम म्हणून साजरा केला जातो. मराठवाडा मुक्ती संग्रामात ज्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या स्वातंत्र्य सैनिकांना मानाचा मुजरा. सर्व मराठवाडा वासीयांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# ज्ञानदीप प्रज्वलित करणारे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

१७ सप्टेंबर ही तारीख मराठवाड्याच्या दृष्टीने दोन अर्थांनी ऐतिहासिक ठरते. एकीकडे हाच दिवस म्हणजे मराठवाड्याच्या मुक्तीसंग्रामाला अभूतपूर्व यश मिळाल्याचा दिवस, तर दुसरीकडे शिक्षणप्रसार, सामाजिक न्याय आणि प्रगतिशील विचारसरणीची परंपरा जोपासणारे 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ' स्थापन झाल्याचा दिवस. मराठवाडा प्रदेशाचा शैक्षणिक आणि सामाजिक इतिहास समृद्ध असून त्यात १७ सप्टेंबर हा दिवस विशेष स्थान राखतो. या दिवशी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली, ज्यामुळे ज्ञानप्रसार, सामाजिक समता, संशोधन आणि सांस्कृतिक संवर्धन या क्षेत्रांत नवा अध्याय सुरू झाला. हे विद्यापीठ केवळ शिक्षणाचे केंद्र नाही, तर मराठवाडा भागातील ग्रामीण–शहरी समाजातील सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या अग्रगण्य शैक्षणिक संस्थांपैकी एक आहे. स्वामी रामानंद तीर्थ हे स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, लोकशिक्षक आणि वंचितांसाठी लढणारे जननायक होते. त्यांच्या जीवनकार्याने समाजात समानता, बंधुता आणि जनहिताची भावना जागवली. त्यांच्या नावाने स्थापन झालेल्या विद्यापीठाने त्यांच्या विचारसरणीची जोपासना करत, विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत सामाजिक जबाबदारी, नैतिक मूल्ये, सहकार्य आणि नेतृत्वगुण आत्मसात करण्याची संधी दिली आहे. वर्धापनदिन हा फक्त विद्यापीठाच्या स्थापनेचा उत्सव किंवा एका विद्यापीठाच्या प्रवासाचा टप्पा नसून, तो मराठवाड्यातील ज्ञानवृद्धी, सामाजिक समता, सांस्कृतिक संवर्धन आणि ग्रामीण विकासाच्या प्रवासाचा गौरव दिन मानला जातो.

स्वामी रामानंद तीर्थ यांचे जीवन संघर्षमय होते. निजामशाहीच्या काळात मराठवाडा सामाजिक अन्याय, आर्थिक विषमता आणि राजकीय दडपशाहीने ग्रस्त होता. त्या काळात त्यांनी सामान्य माणसासाठी शिक्षण, समानता आणि स्वातंत्र्याचे संदेश देत जनतेत जागृती निर्माण केली. त्यांचा असा विश्वास होता की समाजाची खरी प्रगती शिक्षणामुळेच शक्य आहे. शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्याचे साधन नसून समाज बदलण्याचे शक्तिशाली माध्यम आहे, असे त्यांनी ठामपणे मानले. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन, विद्यमान समाजातील दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न विद्यापीठाच्या स्था–पनेतून दिसून येतो. १७ सप्टेंबर १९९४ साली स्थापना झालेल्या या विद्यापीठाने नांदेड, लातूर, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांसाठी उच्चशिक्षणाचे दारे उघडले. विद्यापीठाचे उद्दिष्ट फक्त शिक्षण देणे नसून, ग्रामीण आणि मागासलेल्या समाजातील विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देणे, त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि संशोधनासाठी प्रोत्साहन देणे हा आहे. स्थापनेपासून आजपर्यंत विद्यापीठाने स्थानिक गरजांशी सुसंगत अभ्यासक्रम तयार केले आहेत आणि हजारो विद्यार्थ्यांचे जीवन घडवले आहे. या विद्यापीठातून उच्चशिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी शिक्षण, संशोधन, प्रशासन, उद्योग, सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत कार्यरत असून समाजात मूल्यवर्धन करीत आहेत.

विद्यापीठाच्या शैक्षणिक संरचनेवर लक्ष दिले, तर कला, विज्ञान, वाणिज्य, समाजशास्त्र, कायदा, व्यवस्थापन, संगणकशास्त्र, तंत्रज्ञान, भाषा आणि साहित्य अशा अनेक शाखांमध्ये उच्चशिक्षण उप–लब्ध आहे. आधुनिक प्रयोगशाळा, संगणक केंद्रे, डिजिटल शिक्षण सुविधा, ग्रंथालय आणि शैक्षणिक सॉफ्टवेअर या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञानप्राप्तीची संधी दिली जाते. स्थानिक गरजांशी जुळवून विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख, संशोधनाभिमुख आणि कौशल्याभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थी उच्चशिक्षित होऊन स्थानिक तसेच जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम होत आहेत, ज्यामुळे विद्यापीठाचे स्थान आणि योगदान अधिक दृढ होत आहे. संशोधनाच्या क्षेत्रात विद्यापीठाची कामगिरी उल्लेखनीय आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन, संशोधन प्रकल्प, आंतरशाखीय अभ्यास आणि व्याख्यानमाला यांमुळे विद्यार्थ्यांना संशोधनाची वृत्ती रुजविण्यास प्रोत्स–ाहन मिळते. विज्ञान, तंत्रज्ञान, समाजशास्त्र, कृषी, पर्यावरण, भाषा, इतिहास, संस्कृती, लोकजीवन, आरोग्य आणि पोषण या क्षेत्रांमध्ये विद्यापीठाने संशोधनासाठी सक्षम व्यासपीठ निर्माण केले आहे. नांदेड आणि आसपासच्या ग्रामीण भागातील जीवनातील प्रश्न आणि आव्हाने यावर अभ्यास करून ठोस उपाय आणि शिफारसी विद्यार्थ्यांच्या आणि संशोधकांच्या माध्यमातून समाजास दिल्या जातात.

विद्यापीठ हे समाजाभिमुख शिक्षणाचे प्रतीक आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबत सामाजिक जाणीव, नैतिक मूल्ये, सहकार्य, नेतृत्वगुण, समाजसेवा आणि स्वच्छता यांचा विकास होतो. एनएसएस, एनसी–सी, स्वच्छता अभियान, पर्यावरण संवर्धन, आरोग्य शिबिरे, महिला सक्षमीकरण, ग्रामीण विकास उपक्रम या माध्यमातून विद्यार्थी समाजाशी जोडले जातात. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, साहित्यिक संमेलन, नाट्य, चित्रकला महोत्सव, राष्ट्रीय सण, विचारवंतांचे व्याख्यान अशा माध्यमांतून विद्यार्थ्यांमध्ये समाज, संस्कृती आणि प्रगतिशील विच–ारसरणीची जाणीव रुजवली जाते. स्त्री शिक्षणासाठी विद्यापीठाचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. पारंपरिक समाजरचनेत मुलींचे शिक्षण अनेकदा दुर्लक्षित केले जात असे, परंतु या विद्यापीठाने स्त्रियांना समान संधी दिल्या. आज त्या उच्चशिक्षित होऊन विविध क्षेत्रांत अभियंते, शिक्षक, समाजसेवक म्हणून कार्यरत आहेत. स्त्रियांचे सक्षमीकरण, रोजगारनिर्मिती, सामाजिक सहभाग वाढविणे आणि निर्णयक्षमता विकसित करणे हे विद्यापीठाच्या शिक्षण धोरणाचा महत्त्वाचा भाग आहे.

वर्धापनदिन हा फक्त उत्सवाचा क्षण नसून, आत्मपरीक्षणाचा आणि भविष्याच्या वाटचालीसाठी योजना आखण्याचा क्षण आहे. गेल्या तीन दशकांमध्ये विद्यापीठाने शैक्षणिक, संशोधनात्मक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. डिजिटल शिक्षण, ऑनलाइन अभ्यासक्रम, ई–लायब्ररी, उद्योग–शैक्षणिक सहकार्य, कौशल्य विकास केंद्रे आणि संशोधन उपक्रम यामुळे विद्यार्थी जागतिक पातळीवर स्पर्धा करण्यास सक्षम झाले आहेत. रोजगाराभिमुख अभ्यासक्रम, उद्योजकता प्रोत्साहन आणि कौशल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थी आत्मनिर्भर होत आ–हेत. विद्यापीठाच्या सामाजिक बांधिलकीत ग्रामीण विकासाचा समावेश आहे. कृषी, बेरोजगारी, दुष्काळ, आरोग्य, पोषण, महिला सक्षमीकरण, स्थानिक उद्योग, जलसंधारण, पर्यावरण संवर्धन अशा क्षेत्रांवर संशोधन करून विद्यार्थ्यांनी ठोस उपाय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यापीठाने स्थानिक समाजातील प्रश्नांचे निराकरण करून शैक्षणिक कामगिरीला व्यावहारिक स्वरूप दिले आहे, ज्यामुळे विद्यापीठाचा सामाजिक प्रभाव दृढ झाला आहे. विद्यापीठाच्या कार्याचा प्रभाव आंतरराष्ट्रीय स्तरावरही दिसतो. परदेशी विद्यापीठांसोबत शैक्षणिक देवाणघेवाण, आंतरराष्ट्रीय परिषद यामुळे विद्यार्थी जागतिक ज्ञान आणि अनुभवाशी जोडले जात आ–हेत. जागतिकीकरणाच्या युगात विद्यापीठाने विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी तयार केले आहे.

वर्धापनदिनाचा उत्सव हा प्रेरणादायी क्षण आहे. या दिवशी संस्थापक, माजी कुलगुरू, शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्या योगदानाची आठवण करून दिली जाते. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे विद्यापीठाने आपली वाटचाल सुलभ केली आहे. माजी विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरा–वर यशस्वी होत आहेत, जे विद्यापीठाच्या शिक्षणाची, संस्काराची आणि प्रेरणेची खरी ताकद दर्शवते. आज शिक्षण हे केवळ माहिती मिळवण्याचे साधन नाही, तर जीवन जिवंत करण्याचे माध्यम बनले आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने ज्ञान, कौशल्य, सामाजिक जाणीव आणि नैतिक मूल्यांचा संगम साधला आहे.

वर्धापनदिनाच्या निमित्ताने आपण भूतकाळातील संघर्ष, वर्तमानातील यश आणि भविष्याच्या संकल्पांचा गौरव करतो. शिक्षणाचा दीप समाजात सतत प्रज्वलित रा–हो, ग्रामीण व शहरी विद्यार्थी समान संधीने ज्ञानप्राप्ती करून समाजात सकारात्मक बदल घडवू शकतील, हीच या दिवशीची खरी अपेक्षा आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे ज्ञान, संशोधन, संस्कृती आणि समाजसेवेचे एकत्रित रूप आहे. १७ सप्टेंबरचा वर्धापनदिन फक्त एका संस्थेचा नाही, तर संपूर्ण मराठवाड्याच्या शिक्षण, सामाजिक न्याय आणि प्रगतिशीलतेचा उत्सव आहे. हा दिवस आपल्याला भूतकाळातील संघर्ष आठवून देतो, वर्तमानातील कार्याचे महत्त्व पटवून देतो आणि भविष्याच्या वाटचालीसाठी प्रेरित करतो. विद्यापीठाने प्रज्वलित केलेला ज्ञानदीप पुढील पिढ्यांपर्यंत उजळत राहो आणि मराठवाड्यातील प्रत्येक घरापर्यंत शिक्षणाचा किरण पोहोचो, हीच खरी कामगिरी ठरेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत)**

# गावाचा विकास करयाचा असेल तर विरोधकांसह सर्वांना सोबत घ्यावा -मंत्री जयकुमार गोरे

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री /प्रतिनिधी /** सेवा पंधरवड्यात विविध प्रमाणपत्रे, शेती, बंदर, रस्ते यासारख्या समस्या सोडवण्यासाठी उपक्रम राबवले जातील. या उपक्रमात प्रत्येक गावात विशेष ग्रामसभा होणार आहे. महाराष्ट्रातील एक कोटी लोक ग्रामसभेत सहभागी होतील. चांगले काम करणारी गावे पुढे येतील, असे प्रतिपादन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून महात्मा गांधी जयंतीपर्यंत म्हणजे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत सेवा पंधरवडा साजरा होणार आहे. या उपक्रमाचा शुभारंभ आमदार अनुराधा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली फुलंब्री तालुक्यातील किनगाव येथून होणार आहे. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत.रविवारी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज सेवा कार्यशाळा आणि छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानाच्या पार्श्वभूमीवर कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे होते. आमदार प्रशांत बंब, आमदार अनुराधा चव्हाण भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ यांच्या सह आदींची उपस्थितीत दीप प्रज्वलन करून अभियानाची सुरुवात करण्यात आले.

सुहास शिरसाट, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अंकीत, वासुदेव साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जयकुमार गोरे म्हणाले, आज शेतकऱ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा होतात. हे फक्त महायुती सरकारच करू शकते.

दर महिन्याला दीड हजार रुपये बहिणींना देतात. २० लाख घरकुलांना एकाच दिवशी मंजुरी दिली. ९० दिवसांत घरकुल पूर्ण करण्यासाठी स्पर्धा सुरू आहे.गावकऱ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. आमदार अनुराधा चव्हाण या सक्षम महिला आमदार आहेत. मंत्रालयातील प्रत्येक टेबलवर पोहोचणाऱ्या त्या एकमेव आमदार असल्याचे गोरे यांनी सांगितले.आमदार अनुराधा चव्हाण म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान ग्रामीण भागाच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे. या पंधरवड्यात रस्ते, पाणंद रस्ते यांसारखी कामे होतील. जयकुमार गोरे यांनी २० लाख घरकुलांना मंजुरी देऊन इतिहास घडवला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गतिमान सरकार काम करत आहे. सर्व शासकीय यंत्रणा एकत्र आणून हा पंधरवडा समृद्धपणे साजरा करू.




गावातच राहून शिक्षण द्या

आमदार प्रशांत बंब यांनी शिक्षकांवर टीका करत सांगितले की, शिक्षक शहरात राहून शाळेचे काम पाहतात. जिल्ह्यात ९० टक्के शिक्षक शहरात राहतात. गावात राहून दर्जेदार शिक्षण द्यावे, ही काळाची गरज आहे.या कार्यक्रमाला देवगिरी कारखान्याचे चेअरमन कल्याण चव्हाण, शिवाजी पाथ्रीकर, कृष्णा सोटम, सांडू जाधव, जितेंद्र जैस्वाल, मंडळ अध्यक्ष सुचित बोरसे , योगेश मिसाळ, सांडु अण्णा जाधव यांच्या सह आदींची उपस्थिती होती.बोरसे, डॉ. गोपाल वाघ, गटविकास अधिकारी उषा मोरे, अभियंता बाबासाहेब शेळके, उपविभागीय महसूल अधिकारी निलम बाफना, तहसीलदार योगिता खटावकर, बालविकास प्रकल्प अधिकारी मनीषा कदम, माजी सभापती सविता फुके आदी उपस्थित होते.

# 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियान;१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान विविध उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** महिलांचे आरोग्य व सक्षमीकरण हे कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीचे प्रमुख केंद्रस्थान आहे. याच उद्देशाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे विशेष राष्ट्रीय अभियान दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे. या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ इंदौर, मध्य प्रदेश येथे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण देशभरातील प्रमुख ठिकाणी करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील राज्यस्तरीय शुभारंभ सोहळा दि.१७ रोजी मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सेंटर, रंगस्वर सभागृह नरिमन पॉईंट येथे राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, राज्यमंत्री आणि मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. राज्यभरात त्याच दिवशी प्रत्येक जिल्हा व महापालिका स्तरावर महिला व बालकांसाठी विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत.

**अभियानाची उद्दिष्ट्ये-**

थ्या अभियानाचा मुख्य उद्देश देशभरातील ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये महिला आणि मुलांसाठी तपासणी व विशेषज्ञ आरोग्य शिबिरांचे आयोजन आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये दररोज (AAMASHC) तपासणी आणि जनजागृती शिबिरांचे आयोजन ग्रामीण रुग्णालये / उपजिल्हा रुग्णालये (CHCs) आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे (AAMASHC) येथे

विशेषज्ञाव्दारे तपासणी शिबिरांचे आयोजन

खासगी महात्मा फुले जनआरोग्य योजना संलग्नीत रुग्णालये व क्लिनिक येथे देखील विशेषज्ञ आरोग्य शिबिरे

या शिबिरांमध्ये विविध आरोग्य सेवा पुरवल्या जातील, ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे:

**१. महिलांची आरोग्य तपासणी:-** उच्च रक्तदाब आणि मधुमेहाच्या निदानासाठी तपासणी करणे.

तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या निदानासाठीची तपासणी करणे.

जोखीम असलेल्या महिलांसाठी क्षयरोग (Tuberculosis) तपासणी.

किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी निमिया (रक्तक्षय) तपासणी आणि समुपदेशन.

आदिवासी भागातील महिलांसाठी सिकल सेल तपासणी कार्ड वाटप आणि आदिवासी भागात सिकल सेल आजाराबाबत समुपदेशन.

**२. माता आणि बाल आरोग्य सेवा**

गर्भवती महिलांसाठी प्रसूतिपूर्व काळजी (ANC) तपासणी व समुपदेशन.

हिमोग्लोबिन तपासणी, तसेच पोषण आणि काळजी यावर समुपदेशन.

बालकांचे आवश्यकतेनुसार लसीकरण

**३. आयुष सेवा**

या अंतर्गत आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी, सिध्द व नॅचरोपॅथी इ. पर्यायी उपचार पध्दतींची सेवा गरजू

रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**४. जनजागृती आणि वर्तणूक बदल संवाद**

किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळीची स्वच्छता आणि पोषणाविषयी जागृती सत्रे महिला बचत गट (डक्ग्वि) आणि पंचायत प्रतिनिधींच्या माध्यमातून खाद्यतेल आणि साखरेचा वापर कमी करण्यावर समुपदेशन.पोषण विषयी समुपदेशन व निरोगी राहण्यासाठी मार्गदर्शन

**५. रक्तदान शिबीरे**

१ ऑक्टोबर हा राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिन असून त्याअनुषंगाने राष्ट्रीय महास्वेच्छा रक्तदान या अभियानात राबविण्यात येईल. इंडियन रेड क्रॉस सोसायटी, अखिल भारतीय तेरापंथ युवक परिषद इ. संस्थांच्या साहायाने १ लाख युनिट रक्त गोळा करण्याचे ध्येय असून, रक्तदात्यांची नोंदणी करण्याचेही प्रस्तावित आहे. My Gov. Portal द्वारे रक्तदान प्रतिज्ञा उपलब्ध करुन देण्यात येईल.

**६. नोंदणी आणि कार्ड वाटप**

आयुष्यमान भारत डिजीटल मिशन कार्ड (ABDM²), पंतप्रधान जन आरोग्य योजना (PMJAY) अंतर्गत नोंदणी व आयुष्यमान वय वंदना कार्ड वाटप सर्व गरजू व पात्र लाभार्थ्यांना करण्यात येईल.

७.क्षयरोग निर्मुलनासाठी निक्षय मित्र स्वयंसेवकांची नोंदणी क्षयरुग्णांना दत्तक घेऊन त्यांना पोषक आहार उपलब्ध करुन देण्यासाठी आणि क्षयरोगाविरुध्द जन आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी दानशुर व्यक्ती, संस्था आणि संघटनांना निक्षय मित्र बनवून सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. याकरिता माय भारत स्वयंसेवक अथवा इतर स्वयंसेवकाच्या मदतीने निक्षय मित्रांची नोंदणी वाढवण्यात येईल, जेणेकरुन क्षयरोग मुक्त भारताचे ध्येय साध्य करणे शक्य होईल.तपासणी शिबीरामध्ये (Screening camp) मध्ये आवश्यक असणाऱ्या रुग्णांना विशेषज्ञा कडून तपासणीसाठी संदर्भित केले जाईल व त्यांच्या आवश्यक त्या रक्त लघवीच्या तपासण्या, सोनोग्राफी, क्षकिरण तपासणी व शस्त्रक्रिया मोफत व नियोजन करुन करण्यात आले आहे.

**विविध उपक्रम**

प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालयांमध्येआरोग्य शिबिरे.असंसर्गजन्य रोग तपासणी शिबिरे (मधुमेह, रक्तदाब, कर्करोग, हृदयरोग).मोफत चष्मा वाटपासह नेत्र तपासणी शिबिरे.दंत तपासणी शिबिरे.माता आणि बाल आरोग्य शिबिरे (प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण) महिला आणि बालकांसाठी पोषण जागरूकता सत्रे.,ठिकाणी आयुष आणि योग शिबिरे.,क्षयरोग जागरूकता आणि तपासणी शिबिरे.,रक्तदान शिबिरे.,अवयवदान प्रतिज्ञा शिबिरे.,मोफत औषध वितरण शिबिरे.,निदान शिबिरे (पॅथॉलॉजी, एक्स-रे, ईसीजी).,कर्करोग जागरूकता आणि तपासणी शिबिरे.,मानसिक आरोग्य समुपदेशन शिबिरे.,व्यसनमुक्ती जागरूकता सत्रे.,किशोरवयीन आरोग्य सत्रे.,शालेय आरोग्य तपासणी शिबिरे.,स्वच्छता आणि स्वच्छता जागरूकता शिबिरे.,ब्लॉक आणि जिल्हा स्तरावर आरोग्य मेळावे / प्रदर्शने.,दुर्गम भागांसाठी टेलिमेडिसिन सल्लामसलत.,

सहभागी संस्था व केंद्रे :

२७९ उपकेंद्रे

५३ प्राथमिक आरोग्य केंद्रे

३९ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे

०२ शहरी सामुदायिक आरोग्य केंद्रे

३३ शहरी उपकेंद्रे

१० ग्रामीण रुग्णालये, ०३ उपजिल्हा रुग्णालये, ०१ जिल्हा रुग्णालये.राज्यातील सर्व आरोग्य केंद्रे, संस्था, वैद्यकीय महाविद्यालये व खासगी महात्मा फुले जन आरोग्य योजना संलग्न रुग्णालये सर्व खासगी वैद्यकीय व्यावसायिक संघटना यांचा अभियानात सक्रिय सहभाग लाभणार आहे.'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या अभियानाचा लाभ जिल्ह्यातील सर्व मुली व महिला यांनी घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.कमलाकर मुदखेडकर, मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.पारस मंडलेचा यांनी केले आहे.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

**महोदय,**

सिध्देश्वर अर्बन कोऑप क्रेडिट सोसायटी लि विहामांडवा. ता. पैठण जि. छ. संभाजीनगर या संस्थेच्या सर्व भागधारक सभासदांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,दि.०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ अखेरच्या सहकारी वर्षासाठी पहिली / दूसरी / तिसरी वार्षिक सर्व साधारण सभा सोमवार दिनांक२९/०९/२०२५रोजीदुपारी०१.०० वाजता विहामांडवा सिध्देश्वर अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी .लि विहामांडवा शाखा विहामांडवा येथे संस्थेच्या अध्यक्ष **श्री.मनीषा भागवत डुकरे** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासद बंधु-भगिनींनी सर्व साधारण सभेस उपस्थित रहावे हि विनंती.

**सभे पुढील विषय-**

१) मागील सर्व साधारण सभेचा इतिवृत्तांतवाचून कायम करणे.

२) सन२०२४-२०२५या कार्यकारी मंडळाचा अहवाल तेरीज पत्रक, नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रकास मान्यता देणे बाबत.

३) सन२०२४-२०२५चा ऑडिट मेमोवदोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

४) सन २०२४-२०२५ च्या नफा विभागणीस मान्यता देणे बाबत.

५) सन २०२५-२०२६ चे अंदाज पत्रकास मान्यता देणे बाबत.

६) सन२०२४-२०२५च्या नवीन सभासदांना मान्यता देणे.

७) दिनांक ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रका पेक्षा कमी-जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे

८) सन २०२५-२०२६ साठी च्या लेखापरिक्षकास मान्यता देणे बाबत.

९) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुउपस्थित सभासदांची रजा मंजुर करणे बाबत.

१०) अधिकृत भाग भांडवल चौदा लाख रुपयांवरून पन्नास लाख रुपया पर्यंत मान्यता देणे.

११) कर्ज वाटप मर्यादा एक लाख पन्नास हजार रुपया वरून पंधरा लाख रुपये करण्यास मान्यता देणे.

१२)मा. सहकार आयुक्तव निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणेयांच्या दि .२९/०७/२०२५रोजी च्या सूचनेनुसार नवीन सुधारितआदर्श उपविधी स्वीकारण्या बाबत.

१३) उपविधीमध्ये आवश्यक दुरुस्ती करणे बाबत..

१४)ऐन वेळ च्या विषयांवर चर्चा करणे मा. अध्यक्षांच्यापरवानगीने.

**स्वाक्षरीत/-**

**मानद सचिव**

**सिध्देश्वर अर्बन कोऑप क्रेडिट सोसायटी लि.**

**विहामांडवा**

**संचालक मंडळाच्या मान्यतेवरून**

टिप:१. महाराष्ट्र सहकारी संस्थाअधिनियम १९६०चा नियमक्र. २२प्रमाणे प्रारंभी गण संख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास तीच सभा त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर घेण्यात येईल, त्या वेळी गण संख्येचीआवश्यकता राहणार नाही.

२. सभासदांना विधायक सूचना करावयाच्या अतीलतर त्यांनी सभेपूर्वी ५ दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयामध्ये लेखी स्वरुपात किंवा संस्थेचा मेल आयडी siddheshwarurbangmail.com वर पाठवाव्यात, तद नंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.

३. वैयक्तिक तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

४. थकीत सभासदांना सर्वसाधारण सभेच्या चर्चेत भाग घेता येईल, परंतु त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही.

५. अहवालामध्ये काही मुद्रणदोष आढळल्यासते सभास्थानी दुरुस्त करण्यात येईल.

६. ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित रहाता येणार नाही अशा सभासदांनी दि. २७/०९/२०२४ पुर्वी संस्थेच्या कार्यालयीन वेळेत रजेचा अर्ज दाखल करावा.

# निमखेडी पाझर तलावाचा सांडवा फुटला


**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव /विजय पगारे /** सोयगाव तालुक्यातील जरंडी मंडळात जरंडी सह निमखेडी ,घोसला शिवारात सोमवारी रात्री झालेल्या ढगफुटी च्या पावसाने निमखेडी पाझर तलावाचा सांडवा फुटला मुळे सांडव्याचे पुराचे पाणी थेट शेतात शिरल्याने तब्बल निमखेडी शिवारातील सहाशे एकरवर कपाशीची पिके वाहून गेली असून घोसल्या च्या खटकाळी नदीच्या पात्राने रुद्रावतार घेतल्या मुळे ७५ शेतकऱ्यांची शेती पिकांसह खरडून वाहून गेली आहे यामध्ये सुधाकर युवरे,श्रावण युवरे,दरम्यान निमखेडी शिवारात सांडव्याच्या पुरात अंकुश पांडे यांची तीन शेळ्या व एक बैल घोसल्यात दीपक सुभाष गवळी यांचे चार जनावरे नाल्याच्या पूरात वाहून गेले आहेत दरम्यान घोसला शिवारात ढगफुटी च्या पावसानेही कपाशी चे नुकसान झाले असून, घोसला शिवारात शंभर टक्के नुकसान झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली आहे निमखेडी पाझर तलावाचा सांडवा फुटल्याने जलसंधारण विभागाचे अभियंता सूर्यकांत निकम् यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे दरम्यान घोसल्या च्या खटकाल नदीच्या पुलावरून पाणी वाहून शेतात शिरून पिके वाहून गेले त्यामुळे पिके वाहून गेले आहेत मृत जनावरांवर पशुसंवर्धन विभागाचे डॉ दानिश बुखारी यांनी शवविच्छेदन केले आहे उमर विहिरे गावालगत असलेल्या नाल्याच्या पूराचे पाणी शेतात शिरले त्यामुळे उमर विहिरे परिसराला पिकांचे नुकसान झाले आहे.दरम्यान घोसला गावात बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीची तहसीलदार मनीषा मेने, तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांचेसह कृषी, महसूल च्या पथकाने पाहणी केली आहे.

**घोसला शिवरात खट काळीचे पुराच्या पाण्यात पिके शेतीसह वाहून गेले**

**कडे वडगावच्या पुरात गावात पाणी शिरले**

दरम्यान सोयगाव-चाळीसगाव रस्त्याच्या लगत असलेल्या कडे वडगावच्या नाल्या च्या पूराचे पाणी घरात शिरुन नुकसान झाले आहे या पूरात एक घोडा वाहून आला आहे




**घोसला गावात चूल पेटली नाही**

दरम्यान घोसला गावात सहशेच्या वर शेतकऱ्यांचे हाती येणारे कपाशी पिके आडवी झाल्याने शेतकऱ्यांना अश्रू अनावर झाले होते त्यामुळे घोसला गावात चूल पेटली नव्हती असे बाधित शेतकरी सुनील अरुण पाटील यांनी सांगितले.

# कोहिनूर महा विद्यालयात विद्यार्थिनीचा प्राध्यापकावर विनयभंगाचा आरोप,थेट पोलीस अधीक्षककडे केली तक्रार

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/प्रतिनिधी/** खुलताबाद येथील कोहिनूर महा विद्यालयातील एका प्राध्यापकावर विद्यार्थिनीने विनयभंगाचा गंभीर आरोप केला असून,थेट छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिस अधीक्षकांकडे गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.या प्रकरणामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.मंगळवारी (ता.१६) दिलेल्या तक्रारीत नमूद आहे की गाडेजळगाव (ता. छत्रपती संभाजीनगर) येथील सादिया ईमरान पठाण ही विद्यार्थिनी १२ वी (विज्ञान) शिकत असून, १५ सप्टेंबर रोजी ही घटना घडली. तिच्या म्हणण्यानुसार, प्राध्यापक निलेश व्यंकटराव देवगांवकर यांनी महाविद्यालय परिसरात तिचा बुरखा ओढला, अंगाला हात लावला, हात धरून ओढले तसेच शिवीगाळ केली. हे कृत्य विद्यार्थिनीचा सरळसरळ विनयभंग करणारे आहे, असा गंभीर आरोप तिने आपल्या तक्रारीत केला आहे.घटनेच्या वेळी विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी व महाविद्यालयीन प्राचार्य उपस्थित असल्याचे विद्यार्थिनीने नमूद केले आहे. तसेच संपूर्ण प्रकार महाविद्यालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याचा दावाही करण्यात आला आहे.एका प्राध्यापकाने विद्यार्थिनीशी असे वर्तन करणे ही शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणारी बाब आहे. या प्रकरणी तातडीने कडक कारवाई करावी, अशी मागणी सादिया पठाण हिने निवेदनातून केली आहे. तिने आपले आधारकार्ड व प्रवेशाचा पुरावा सुद्धा जोडला आहे.सदर प्रकरणामुळे कोहिनूर महा विद्यालयात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.पोलिसांकडून चौकशी सुरू करून पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.




# अवैध मद्यविक्री प्रकरणी १२२ ढाबाचालक दोषी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** राज्य उत्पादन शुल्क विभागाने एप्रिल २०२५ पासून ऑपरेशन प्रहार राबविले आहे. त्याअंतर्गत एप्रिल ते ऑगस्ट या दरम्यान जिल्ह्यात अवैध मद्यविक्री व बेकायदा ढाबा चालकांविरुद्ध केलेल्या कारवाईत ४७५ गुन्हे दाखल केले. ८४४ आरोपींना अटक केली. २८ लाख ८ हजार ३८४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. नुकत्याच झालेल्या लोकअदालतीत २६ खटल्यांची सुनावणी झाली. १२२ आरोपी दोषी ठरले व त्यांच्याकडून ७ लाख ८१ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक यांनी दिली आहे.

**ऑपरेशन प्रहार**

अवैध मद्यविक्री आणि बेकायदा ढाब्यांविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क विभाग एप्रिल २०१५ पासून ऑपरेशन प्रहार राबवित आहे. एप्रिल ते ऑगस्ट या पाच महिन्यांच्या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाने ४७५ गुन्हे दाखल केले. ८४४ जणांना अटक करण्यात आली आणि २८ लाख ८ हजार ३८४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जिल्हा विधी सेवा केंद्रामार्फत दि.१३ सप्टेंबर रोजी झालेल्या लोकअदालतीत महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ च्या कलम ६८ आणि ८४ अंतर्गत २६ खटल्यांचा निकाल लागला त्यात १२२ जणांवर दोष सिद्ध झाला. त्यांच्याकडून ७ लाख ८१ हजार ९०० रुपये दंड वसूल करण्यात आला.दोषसिद्धी मध्ये जिल्ह्याची ही आघाडी आहे. परवानाधारक ठिकाणांव्यतिरिक्त अवैध मद्यविक्री, त्यास बेकायदा जागा पुरविणे, मद्यपान करणे अशा गैरप्रकारांविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत कारवाई केली जाईल,असेही अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांनी कळविले आहे.

# उर्मिला बोरसे यांना राज्यस्तरीय समाजसेविका पुरस्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे / प्रतिनिधी /** सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सौ उर्मिला नानाजी बोरसे दिप सिटी,न्यु पनवेल यांना दिशा महाराष्ट्राची या चॅनलकडून राज्यस्तरीय समाजसेविका पुरस्काराने गौरविण्यात आले. चॅनलचे संचालक तुषार गौतम नेवरेकर व त्यांच्या टीमच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.उर्मिला बोरसे या ज्योतिषी व आध्यात्मिक मार्गदर्शक असून, त्यांनी समाजातील विशेषतः महिलांसाठी उल्लेखनीय काम केले आहे. त्यांनी आतापर्यंत ५ हजारांहून अधिक महिलांना मार्गदर्शन केले असून त्यापैकी २ हजारांहून अधिक महिलांना अत्यंत सकारात्मक अनुभव मिळाले आहेत. महिलांच्या समस्या सोडविणे, योग्य दिशा दाखविणे आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

शिक्षणातील अडचणी, अनेक आजार, मानसिक तणाव व कौटुंबिक समस्या या विषयांवर त्यांनी सोपे व परिणामकारक उपाय सुचवून हजारो लोकांना दिलासा दिला आहे. विशेषतः अध्यात्मिक साधना, उपासना व ज्योतिष शास्त्राच्या आधारे त्यांनी अनेक मुलींचे संसार मार्गी लावले असून, गरजू महिलांना नवे आयुष्य मिळवून दिले आहे.सन्मान स्वीकारताना उर्मिला बोरसे म्हणाल्या की, हा पुरस्कार माझ्या व्यक्तिगत कार्याचा नव्हे तर समाजाच्या विश्वासाचा सन्मान आहे. अध्यात्म, ज्योतिष व योग्य मार्गदर्शनाच्या आधारे लोकांचे जीवन बदलू शकते, याचा मला आनंद आहे. या सन्मानामुळे समाजासाठी अधिक कार्य करण्याची प्रेरणा मिळाली आहे.



# पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे भव्य आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** भारत देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त जालना शहरातील गुरु गणेश भवन, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वा. भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात महा रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, चित्रप्रदर्शनी आणि स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे.या कार्यक्रमाचे उदघाटन माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या शुभहस्ते संपन्न होणार असून, जालना विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार कैलासजी गोरंट्याल, जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थित असणार आहे.

या प्रसंगी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा वाढदिवस केवळ औपचारिकतेपुरता न राहता समाजोपयोगी उपक्रमांद्वारे साजरा करणे हीच खरी सेवा आहे, नागरिकांनी अशा शिबिरांचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा, हेच समाजाच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरेल, भाजपाच्या कार्यपद्धतीत समाजसेवा हेच केंद्रबिंदू असून या उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये सेवा व सहभागाची भावना दृढ होत आहे. या शिबिराला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून रक्तदान करून आरोग्य तपासणीचा लाभ घ्यावा असे आवाहन जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले आहे.

# सावळदबारा सर्कलमध्ये संघटक गुलाबराव पाटील कोलते यांचा दौरा



**आत्ताच एक्सप्रेस**

**सावळदबारा / प्रतिनिधी/** सोयगाव तालुक्यातील सावळदबारा सर्कल दौरा दि. १५ सप्टेंबर रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांनी सावळदबारा सर्कलमधील गावांचा दौरा केला. सावळदबारा, डाभा, जामठी, मोलखेडा, घाणेगाव, देव्हारी, नांदातांडा आदी गावांना त्यांनी भेटी दिल्या.यावेळी दिनकर शिपल्कर,एकनाथ सपाटे, शेषराव पाटील, सखाराम कोते, बाबु सपाटे, ताराचंद जाधव आदी होते.



सीना नदी यावरील पुलाचे दुरावस्था नदीत असलेला गाव पूर्ण कठड्याला अडकलेला दिसून येत आहे व रात्री ट्रॅक्टर एक कार व एक आपे वाहून गेल्या.

# विकसीत भारत यंग लिडर डॉयलॉग क्विझ मध्ये युवक-युवतींसाठी ज्ञान, संधी आणि गौरवाचा मंच

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** मेरा युवा भारत, युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयाच्या स्वायत्त संस्थेमार्फत देशभरातील युवकांना ऑनलाइन स्वरूपात विविध उपक्रमांमध्ये सहभागी करून घेण्यात येत आहे.

त्याचाच एक भाग म्हणून विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग (VBYLD) क्विझ आयोजित करण्यात आला असून जालना जिल्ह्यातील युवकांचा यात मोठ्या संख्येने सहभाग व्हावा, यासाठी मेरा युवा भारत, जालना मार्फत विशेष प्रयत्न सुरू आहेत.

या क्विझमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक युवक-युवतीला माय भारत पोर्टल तर्फे प्रमाणपत्र देण्यात येणार असून सर्वोत्तम गुण मिळवणाऱ्या स्पर्धकांना विशेष गौरवही केला जाणार आहे. युवकांनी आपल्या ज्ञानाची चाचणी घेण्यासाठी, स्वतःला सिद्ध करण्यासाठी तसेच प्रमाणपत्र मिळवण्यासाठी या क्विझमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे.

क्विझमध्ये सहभागी होण्यासाठी युवकांनी My Bharat Portal https://mybharat.gov.in किंवा दिलेला ठठ कोड स्कॅन करून नोंदणी करून क्विझ सोडवावा.

जालना जिल्हा राज्यात सर्वाधिक सहभाग नोंदवणारा ठरावा या हेतूने युवक मंडळे, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था तसेच सर्व युवकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रणीत सांगवीकर, जिल्हा युवा अधिकारी, माय भारत, जालना यांनी करण्यात केले आहे.

# जलगाव बाजार समिती कै.वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्काराने सन्मानित- उपसभापती श्रीहरी मोरे यांनी स्विकारला पुरस्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**माजलगाव/ प्रतिनिधी /** येथील कृषि उत्पन्न बाजार समितीला उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने संघाचे संस्थापक वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले असुन उपसभापती श्रीहरी दिगंबरराव मोरे यांनी पुणे येथे दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी संघाच्या सर्वसाधारण सभेत हा पुरस्कार स्विकारला.

महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने उत्कृष्ट कार्य करणा-या बाजार समित्यांना हा पुरस्कार देउन सन्मानित केले जाते.

माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीने वार्षीक सभा घेणे, नियमीत वेळेवर लेखापरिक्षण करणे, दोष दुरूस्ती अहवाल, शेतकऱ्यांसाठी नाममात्र दरात भोजन व्यवस्था, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, पार्कींग व्यवस्था अशा विवीध शेतकरी हिताच्या योजना राबवत उत्कृष्ट असे कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने संघाचे संस्थापक वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्कार २०२५ ने माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीला सन्मानित करण्यात आले असुन उपसभापती श्रीहरी दिगंबरराव मोरे यांनी पुणे येथे हा पुरस्कार स्विकारला यावेळी संचालक आसाराम घायतिडक, भगवान आगे, आबाजी भोसले, संजय कचरे, सचिव एच. एन. सवणे,



लेखापाल उध्दव फपाळ, नितीन पौळ, सुमित पौळ, गणपतराव कदम, दिनानाथ शेंडगे यांची उपस्थिती होती.





काल रात्री पडलेल्या मुसळधार पावसामुळे जालना जलमय झाल्याची दिसून येत आहे. एस बी शाळेच्या पाठीमागे साचलेले पाणी शाळेतील विद्यार्थी जात असताना,गरपरिषद कडे जाताना बांधलेले मोठे कॉम्प्लेक्स यामध्ये खालच्या तळाला साचलेले पाणी,टाऊन ऑल परिसरात जाताना विद्यार्थिनी ,मांगवाडा परिसरातील एका घरातील पाणी काढताना व केशव कानपुडे यांनी त्याची पाहणी केली ,अमृतेश्वर मंदिरातील महादेवाची मूर्ती पाण्याखाली दिसत आहे फोटो क्रमांक ३३५९ पुंडलिका नदी बुथडीवरून वाहत आहे फोटो क्रमांक ३३६६ सीना नदी यावरील पुलाचे दुरावस्था नदीत असलेला गाव पूर्ण कठड्याला अडकलेला दिसून येत आहे व रात्री ट्रॅक्टर एक कार व एक आपे वाहून गेल्या ,लक्कडकोट परिसरातील नदीच्या काठावर असलेले घर व दुकान ची दुर्वास्था घर वाहून गेले दिसून येत आहे, बाळासाहेब बंधारा दुथडी होऊन वाहत आहे ,अरविंद चव्हाण यांचे रेल्वे स्टेशनवर असलेले कॉम्प्लेक्स खालील भागात साचलेले पाणी दिसून येत आहे, रेल्वे स्टेशन रोड रोडवर असलेले मोठे कॉम्प्लेक्स यामध्ये सनराईज हॉटेल व इतर दुकाना पाण्याखाली दिसून येत आहे,रेल्वे स्टेशन रोड वरील कृष्णा बिझनेस सेंटर खाली असलेल्या कॉम्प्लेक्स मध्ये पूर्ण दुकान पाण्याखाली व चार कार ,उद्या १७ सप्टेंबर असून टाऊन हॉल येथील मुक्तिसंग्राम स्तंभाजवळ पावसामुळे साचलेले पाणी काढताना नुकतेच बांधलेले विसर्जनाचे जल कुंभ ओर फ्लो झाल्याची दिसून येत आहे .

**महाराष्ट्र शासन**

# सार्वजनिक बांधकाम विभाग जालना

**ई लिलाव सुचना क्र. २/२०२५**

**(ई-लिलाव पध्दतीकरिताचा अंतर्भाव )**

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना अंतर्गत असलेल्या निरुपयोगी जड व हलके वाहने, टायर्स, ट्युब व भंगार यांचे ई-लिलाव पध्दतीने विक्री करणेकरीता इच्छुक लिलावदाराचे सहभागाकरीता सदर सूचना प्रसिध्द करण्या येत असुन त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| लॉट क्र. | ई-लिलावाचे वर्णन | इसार रक्कम | ई-लिलाव शुल्क ना-परतावा |
|---|---|---|---|
| १. | निरुपयोगी हलके व जड वाहने, टायर्स, व भंगार साहित्य (सविस्तर तपशील www.eauction.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे) | ३००००० /- | २२४०/- |

१) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना, अंतर्गत सा.बां. (यां) शाखा, दुर्गा माता मंदिराजवळ, जालना कडे असलेली निरुपयोगी जड व हलके वाहने, टायर्स व भंगार यांची ई-लिलावाव्दारे विक्री करावयाची असुन विक्री करावयाच्या साहित्याचा सविस्तर तपशील www.eauction.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२ ) ई लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छित असलेल्या लिलावदारांना www.eauction.gov.in या संकेत स्थळावर जाऊन पात्रता मिळविणेसाठी आवश्यक दस्ताऐवजांची ऑन लाईन पूर्तता करावी लागेल. तसेच त्याबाबत आवश्यक इसारा रक्कम इत्यादीची पूर्तता Demand Draft च्या स्वरुपात करावी लागेल.

३) इच्छुक लिलावदारांची दस्तऐवज व अन्य बाबतची पडताळणी करुन त्यांना प्रत्यक्ष लाईव्ह ई-लिलाव

४) प्रक्रियेमध्ये सहभागी होणेसाठी पात्र करण्यात येईल. केवळ पात्र लिलावदारांना या लाईव्ह ई-ऑक्शन मध्ये सहभागी होता येईल.

सदर बाबत अधिक तपशीलाकरीता निम्न नमूद कार्यालयाकडे इच्छुक लिलावदारांना चौकशी करता येईल.

अ) कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जालना, दुरध्वनी क्रमांक. ०२४८२-२३०१४३

ब) सहाय्यक मुख्य अभियंता (यांत्रिकी) सार्वजनिक बांधकाम प्रादेशीक विभाग, छत्रपती संभाजीनगर बांधकाम भवन, छत्रपती संभाजीनगर दुरध्वनी क्र. ०२४०-२३३१८१५

५) इच्छुक लिलावदारांना दि. १८.०९.२०२५ (वेळ १३.०५) ते दि. ०१.१०.२०२५ (वेळ १५.००) या कालावधीत www.eauction.gov.in या संकेत स्थळावर आवश्यक बाबींची ऑन लाईन पध्दतीने पूर्तता करता येईल.

५) सदरील ई-लिलाव सूचनेबाबतचा अधिकचा तपशील www.eauction.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र. / भांडार ३६५४/२०२५
कार्यकारी जालना
सा.बां. विभाग, जालना यांचे कार्यालय
दिनांक : ८ सप्टेबंर २०२५

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विभाग, जालना**

GOVERNMENT OF MAHARASTRA
PUBLIC WORKS DEPARTMENT
PUBLIC WORKS DIVISION, SANGAMNER
e-auction Notice No.01

This auction sale notice is published for intenting bidders. Who intent to participate in e-auction for the sale of unserviceable Light & Heavy Vehicles, Construction machineries belonging to the Executive Engineer P.W.Division, Jalna in the State of Maharashtra. The details of notice are as under.

| Lot No | Description | EMD | Auction Fees (Non Refundable) |
|---|---|---|---|
| 1. | Auction Sale of unserviceable Light & Heavy Vehicles, Construction machineries, Tyres & Scrap material.(The details of material kept for. e-auction is available on website - www.eauction.gov.in) | 300000/- | 2240/- |

1) Unserviceable Light & Heavy Vehicles, machinery/ scrap/ Tyres etc belonging to the Executive Engineer P.W. Division, Jalna at P.W.(Mech) Section, Near Durga Mata Temple, Jalna,within the juridication of Division are to be sold through e-auction. The details of material kept for e-auction is available on website www.eauction.gov.in

2) The bidder who wants to participate in the e-auction process have to enroll their names online through the website www.eauction.gov.in The bidder has to upload the scan copy of duly filled form alongwith required document and should remit the EMD amount to the Government Office in the form of Demand Draft for enrollment procedure.

3) After scrutiny of documents submitted by intenting bidder and if the documents are found correct the bidder will be declared qualified to participate in e-auction prosess. Only qualified bidder can participate in e-auction process.

4) For any additional information regarding e-auction the intenting bidder can contact
following offices.
a. Office of the Executive Engineer, Public Works Division, Jalna Telephone No-02482-230143
b. Assistant Chief Engineer (Mech.)P.W. Region, Chhatrapati Sambhajinagar Bhandhkam Bhavan, Chhatrapati Sambhajinagar, Telephone No-0240-2331815

5) The intenting bidder can apply for registration online by visiting the website www.eauction.gov.in during the period 18.09.2025 (13.00) To 01.10.2025 (15.00)

6) For additional information regarding e-auction please visit the website. www.eauction.gov.in)

Outword No. Store/ Mech/3654/2025
Office of the Executive Engineer
P.W. Division, Jalna
Date: 8 SEP 2025

**SD/-**
**Executive Engineer**
**Division Jalna**

जिमाका/जालना/जाहि./६२३/२०२५

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247

The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813